PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

4/11/15

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
२२८१६६५६/२२८४१२५५

प्रसिध्दी पत्रक क्र.५०
दिनांक : ०४.११.२०१५

'प्रवाशांशी थेट भेट' प्रवासी वाढविण्याकरिता अभियान

मुंबई, ०४ - बेस्ट उपक्रमाने प्रवाशांच्या मनात उपक्रमाच्या बससेवेबद्दल विश्वास निर्माण करुन बेस्टचे उत्पन्न आणि प्रवासी वाढविण्यासाठी **' प्रवाशांशी थेट भेट '** हे प्रवासी संपर्क अभियान सुरु केलेले आहे. या अभियानांतर्गत **रविवार, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१५** रोजी बेस्ट उपक्रमाच्या **शहर विभागातील** कुलाबा, बॅकबे, सेंट्रल, वरळी, वडाळा आणि वांद्रे या आगारांचे आगार व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी सकाळी ११.०० वाजता आगारांमध्ये उपस्थित राहून प्रवाशांशी थेट संपर्क/संवाद साधून बससेवेसंबंधातील त्यांच्या अडचणी आणि सूचनांची नोंद घेणार आहेत. तसेच बससेवेचा स्तर सुधारण्यासाठी व प्रवासी उत्पन्नात वाढ करण्यासाठी बसप्रवाशांकडून सूचना स्विकारण्यात येणार आहेत.

सर्व बसप्रवाशांना व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या अभियानास हजर राहून आपल्या सूचना/अडचणी व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देऊन, अभियान यशस्वी करण्यास सहकार्य रहावे.